# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ३९९-२२ दिनांक २९/१२/२०२२

## मिड-लाईफ ऑर्केस्ट्रा बारवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई

दिनांक २८.१२.२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे पोलीस अधिकारी/अंमलदार यांना विश्वसनीय बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, मिड-लाईफ ऑर्केस्ट्रा बार, भाईंदर रेल्वे स्टेशनचे पूर्वेस, नवघर, भाईंदर पूर्व या बार आस्थापनेच्या हॉलमध्ये महिला वेटरच्या नावाखाली मुलींकडून नृत्य करवुन घेत असुन सदर बारचे मालक, चालक, मॅनेजर, कॅशिअर, वादक, पुरुष सिंगर व वेटर हे मुलींना नृत्य करण्यास प्रोत्साहीत करत आहेत.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे पोनि समीर अहिरराव यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन पंच व पंटर यांना पाठवून सत्यता पडताळुन दिनांक २८-१२-२०२२ रोजी रात्री २२.२५ वा. छापा टाकला असता मिड-लाईफ ऑर्केस्ट्रा बारमध्ये हिंदी गाण्याच्या व वाद्याच्या तालावरती महिला सिंगर नृत्य व अश्लिल नृत्य करीत असल्याचे निदर्शनास आले. तसेच बारचे चालक, मॅनेजर, कॅशियर, वेटर, पुरुष सिंगर व वादक हे बारमधील महिला सिंगर यांना नृत्य व अश्लिल नृत्य करण्यास बंदी असताना नृत्य करण्यास भाग पाडुन प्रोत्साहित करीत असताना मिळुन आल्याने सदरवेळी कारवाई करण्यात आली. कारवाई दरम्यान ५८,६००/- रु रोख रक्कम व इतर मुद्देमाल जप्त करुन नमुद बार आस्थापनेचे चालक-०१, मॅनेजर-०१, कॅशियर-०१, पुरुष सिंगर-०१, वादक-०१, स्टीवड-०२ व वेटर-०३ अशा एकुण १० इसमांना ताब्यात घेवुन पाहिजे आरोपी ऑर्केस्ट्रा बारचे मालक यांच्याविरुध्द पोशि/१२११८ केशव शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र.१००६/२०२२ महाराष्ट्र हॉटेल, उपहारगृहे आणि मद्यपान कक्ष(बाररुम) यामधील नृत्य व अश्लिल नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये कम करणा-या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम -२०१६ चे कलम ३, ८ (१) (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. समीर अहिरराव, सपोउपनि. उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, पोशि/केशव शिंदे, मपोशि/अश्विनी भिलारे, चा.पोहवा/सम्राट गावडे, नेम.अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांनी केली आहे.

---ooo---